# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com


**डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/गुणवत्ता यादी तपासणी/२०१६/ 6883
दिनांक :- 15 NOV 2016

प्रति,
प्राचार्य,
विना-अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिमार्णशास्त्र,
पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था (इंजिनिअरींग/बी.फार्म)
तंत्रनिकेतने/डी.फार्मसी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
एम.सी.ए/एम.बी.ए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
**औरंगाबाद विभाग.**

**विषय :- संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करताना इलिजिबिलिटी, उमदवारांचे टीसी व मायग्रेशन प्रमाणपत्राबाबत..**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१६/१४९७
दिनांक १५/११/२०१६
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाऔ/शिक्षण/गुणवत्ता यादी तपासणी/२०१६/६२९२
दिनांक २८/०९/२०१६

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी पडताळणी करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.०२ नुसार आपणास कळविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने संस्थांनी गुणवत्ता यादीची तपासणी या कार्यालयाकडून केलेली असून गुणवत्ता यादी मधल त्रुटीची पुर्तता लवकरात लवकर करण्याबाबत संस्थेच्या प्रतिनिधीनां गुणवत्ता यादी तपासणी झाल्या नंतर कळविण्यात आलेले होते. तरी ब-याच संस्थांनी त्रुटीची पुर्तता केलेली नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्र.०१ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादी तपासणी अंति आढळून आलेल्या त्रुटीची पुर्तता तात्काळ करण्यात येवून गुणवत्ता यादीस या कार्यालयाची अंतिम मान्यता दिनांक २०/११/२०१६ पूर्वी घेण्यात यावी. अन्यथा उदभवणा-या परिस्थितीस संस्था जबाबदार राहिल याची संस्था प्रमख यांनी नोंद घ्यावी.

/ प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना देण्यात येवून कळविण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेस्थळावर ई.बी.सी. तपासणी २०१५-१६ या शिर्षाखाली प्रसिध्द करण्यात यावी.